***मंत्रिमंडळ निर्णय :** २० श्रावण १९३२ शके (सायं ५.३० वा.)
बुधवार, दि. ११ ऑगस्ट, २०१०

## मंत्रालयीन नियंत्रण कक्षासाठी ७ कायम स्वरुपी पदे

मुंबई, दि. ११ : मंत्रालय नियंत्रण कक्षाकरिता ७ कायमस्वरुपी पदे निर्माण करण्यास आज मान्यता देण्यात आली.

उप सचिव दर्जाचे एक पद, अवर सचिव दर्जाची २ पदे, कक्ष अधिकारी ४ पदे अशी एकूण ७ पदांना मान्यता देण्यात आली. क व ड संवर्गातील पदे पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे पाळी-पाळीने प्रशासकीय विभागांकडून उपलब्ध करून घेण्यात येतील तसेच तातडीच्या प्रसंगी महसूल व वन विभागातील पर्यायी अधिकाऱ्यांची व्यवस्था करण्यात येईल.

सध्या मंत्रालयीन नियंत्रण कक्षामध्ये विविध मंत्रालयीन विभागांकडील कर्मचारी, महिन्यातील एक अथवा दोन दिवस नियुक्त केले जातात. १२ तासांची एक पाळी अशा दोन पाळ्यांमध्ये या कक्षाचे काम चालते. मात्र, केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाचा नियंत्रण कक्ष व इतर राज्यांचे नियंत्रण कक्ष त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेचा नियंत्रण कक्ष या ठिकाणी असलेले मनुष्यबळ कायमस्वरुपी असते. मंत्रालयीन नियंत्रण कक्षात अस्थायी कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे कामात सलगता राहत नाही व कार्यक्षमतेवरही परिणाम होतो. त्यामुळे कायमस्वरुपी पदे निर्माण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या होत्या. त्याला अनुसुरून हा निर्णय घेण्यात आला आहे.

००००००

## कृषी पंपांच्या देयकातील इंधन आकारापोटी १५१८ कोटी रुपये महावितरणाला देणार

मुंबई, दि. ११ : राज्यातील शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या वीज देयकात मे, २००० ते मार्च, २०१० अखेर आकारण्यात आलेला इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) व इंधन समायोजन आकार (एफसीए) माफ करण्याच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने सखोल विचार करून गेल्या १० वर्षातील या आकाराची १५१८.७५ कोटी रुपयांची रक्कम महावितरणला तीन हप्त्यात अदा करण्याचा निर्णय घेतला.

ज्या शेतकऱ्यांनी फोका व इंधन आकार भरलेला असेल तो त्यांच्या पुढील वीज बिलात समायोजित करण्यात येणार आहे. इंधन समायोजन आकारावरील एकूण रक्कम रुपये १५१८.७५ कोटी इतकी असून त्यावरील एकूण व्याजाची रक्कम रुपये ८९१.६९ कोटी इतकी आहे. व्याजाची रक्कम महावितरण कंपनी माफ करणार आहे. इंधन समायोजन आकारावरील एकूण रक्कम रुपये १५१८.७५ कोटी या थकित रक्कमेचा परतावा शासनाकडून महावितरण कंपनीला तीन वार्षिक हप्त्यात करण्यात येईल.

कृषीपंपाचे वीज देयकात मे, २००० ते मार्च, २०१० अखेर आकारण्यात आलेला इंधन व इतर खर्च समायोजन आकार (फोका) व इंधन समायोजन आकार (एफसीए) माफ करण्यात आला असून सन २०११-१२ पासून विद्युत नियामक आयोग आदेश देईल व त्या दराने इंधन समायोजन आकार त्यांच्या वीज देयकात आकारण्यात येईल.

०००००

. . २/-

## तिलारी जलविद्युत प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामांना मंजुरी

मुंबई, दि. ११ : तिलारी जलविद्युत प्रकल्प टप्पा-२ (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) अंतर्गत बांधावयाच्या भंडोरा नाला, पाळेपरमार नाला व बांद्रा नाला या तीनही नाल्यांवरील धरणांची व अनुषंगिक कामे करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

ooooo

## राज्यात सरासरीच्या १२१ टक्के पाऊस; खरीप पिकांची वाढ समाधानकारक

मुंबई, दि. ११ : राज्याची ९ ऑगस्ट २०१० अखेर दैनंदिन पावसाची सरासरी ६९८.९ मि.मी. असून प्रत्यक्ष ८४९.९ मि.मी. म्हणजेच सरासरीच्या १२१.६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. राज्यात दिनांक ९ ऑगस्ट २०१० अखेरील दैनंदिन सरासरीच्या तुलनेत प्रत्यक्ष पडलेल्या पावसानुसार जिल्ह्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

८० ते १०० टक्के - नंदुरबार, नाशिक, १०० ते १२० टक्के- ठाणे, रायगड, जळगांव, पुणे, कोल्हापूर, नांदेड, नागपूर, गोंदिया तसेच १२० टक्यांपेक्षा अधिक - रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, अहमदनगर, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, लातूर, उस्मानाबाद, परभणी, हिंगोली, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली.

राज्यात ९ ऑगस्ट २०१० अखेरीस पर्जन्यमान सरासरीच्या तुलनेत एकुण ३५५ तालुक्यांपैकी १२ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ६१ तालुक्यात ८० ते १०० टक्के व २८२ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

### राज्यात १३५ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी

राज्याचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १३२.३४ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट २०१० अखेर १३५.८१ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झालेली आहे.

राज्यातील कोकण विभागात भात पीक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. पश्चिम महाराष्ट्रात व विदर्भात भात लावणीची कामे पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक असून आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. मूग व उडीद पिके फुलोरा अवस्थेत आहेत. सोयाबीन, ज्वारी, बाजरी ही पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. कापूस पीक वाढीच्या ते फांद्या फुटण्याच्या अवस्थेत आहे. बागायती कापूस फुलोरा ते बोंडे लावण्याच्या अवस्थेत आहेत.

राज्यातील नागपूर, अमरावती, लातूर व कोल्हापूर विभागात सोयाबीन पिकावर उंट अळी, तंबाखूवरील पाने खाणारी अळी, चक्रीभूंगा व केसाळ अळीचा तसेच नाशिक, अमरावती, लातूर व नागपूर विभागात कापूस पिकावर मावा व तुडतुडे किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

. . ३

## कोकण विभागात ४.९७ लाख हेक्टरात पेरणी

अहवाल कालावधीत विभागात हवामान ढगाळ व दमट होते. विभागातील अहवाल कालावधीत समाधानकारक पावसाची नोंद झाली. विभागात दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेरीस सरासरीच्या तुलनेत एकुण ४७ तालुक्यांपैकी १ तालुक्यात ६० ते ८० टक्के, १७ तालुक्यात ८० ते १०० टक्के व २९ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला. विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०९ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर ४.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ९९ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी/लावणी झालेली आहे. लवकर लागवड झालेल्या भाताची वाढ समाधानकारक असून, पीकवाढीच्या फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. गळीत धान्य व कडधान्य पिकांच्या पेरण्या अंतिम टप्प्यात आहेत.

**किड व रोग :** विभागातील ठाणे व सिंधुदुर्ग जिल्ह्यात लष्करी अळीचा व खोड किडीचा अल्पप्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला आहे.

## नाशिक विभागात चांगला पाऊस

अहवाल कालावधीत हवामान अंशतः ढगाळ होते. अहवाल कालावधीत विभागातील सर्व जिल्ह्यांत पावसाची नोंद झाली. विभागात दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेरीस सरासरीच्या तुलनेत एकुण ४० तालुक्यांपैकी ६ तालुक्यात ६० ते ८० टक्के, १० तालुक्यात ८० ते १०० टक्के व २४ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागाचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.८८ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर २०.३३ लाख हेक्टर क्षेत्रावर पिकाची पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०२ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. भात व नागलीची लावणी अंतिम टप्प्यात आहे. पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक आहे. सोयाबीन, बाजरी, मूग, उडीद व कापूस पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. खरीप पिकांच्या आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. बागायती कापूस फुले/पाते लागण्याच्या अवस्थेत आहेत.

विभागात कापूस पिकावर मावा व तुडतुडे किडींचा आणि ज्वारी पिकावर मावा व मिज माशी या किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

## पुणे विभागात ८.१६ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी

पुणे विभागात दिनांक ९ ऑगस्ट २०१० अखेर सरासरीच्या तुलनेत एकुण ३९ तालुक्यांपैकी ७ तालुक्यात ८० ते १०० टक्के, ३२ तालुक्यात १०० टक्केपेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागातील खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.५४ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर ८.१६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०८ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. विभागात भात व नागली लावणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. लवकर लागवड झालेल्या भात पीक फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहे. लवकर पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक असून आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. मूग व उडीद पीक फुलोरा अवस्थेत आहेत. बाजरी वाढीच्या ते फुटवे फुटण्याच्या अवस्थेत आहेत.

विभागातील अमदनगर जिल्ह्यांत कापूस, सोयाबीन, उडीद व मूग पिकावर मावा तुडतुडे किडींचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

. . ४

**कोल्हापूर विभागातील २७ तालुक्यांनी सरासरी गाठली**

अहवाल कालावधीत विभागात आकाश ढगाळ होते. विभागात दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर सरासरीच्या तुलनेत एकुण ३३ तालुक्यापैकी १ तालुक्यात ६० ते ८० टक्के व ५ तालुक्यात ८० ते १०० टक्के व २७ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागाचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ९.८१ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर ९.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ९४ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. विभागात बाजरी, खरीप ज्वारी व मका वाढीच्या अवस्थेत आहेत. मूग, उडिद, सोयाबीन व भुईमूग फुलोरा अवस्थेत आहेत. पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक असून आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. भात व नागली पिकांच्या लावणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. बागायती कापूस बोंडे भरणेच्या अवस्थेत आहे. विभागात ऊस पिकावर लोकरी मावा व हुमणी किडीचा, सोयाबीन पिकावर उंट अळीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

**औरंगाबाद विभागात १८.४९ लाख हेक्टरात पेरणी**

अहवाल कालावधीमध्ये हवामान अंशतः ढगाळ होते. विभागात दि. ९ ऑगस्ट, २०१० अखेर सरासरीच्या तुलनेत एकूण २८ तालुक्यांपैकी २ तालुक्यात ८० ते १०० टक्के व २६ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागाचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १५.९३ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर १८.४९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ११६ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या पिकांची वाढ समाधानकारक असून आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. मूग पिक फुलोरा ते शेंगा धरण्याच्या अवस्थेत आहेत. कापूस, सोयाबीन, ज्वारी, बाजरी पीके वाढीच्या अवस्थेत आहेत. उडीद पिक फुलोरा अवस्थेत आहेत.

विभागात सोयाबीन पिकांवर, तंबाखूवर पाने खाणाऱ्या अळींचा व उंट अळींचा, कापूस पिकावर बोंड अळीचा व रस शोषणाऱ्या किडीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला आहे.

**लातूर विभागात खरीप पिकांची वाढ समाधानकारक**

अहवाल कालावधीमध्ये हवामान अंशतः ढगाळ होते. अहवाल कालावधीत विभागातील हिंगोली, परभणी व नांदेड जिल्ह्यात जोरदार पावसाची नोंद झाली. विभागात ९ ऑगस्ट, २०१० अखेरीस सरासरीच्या तुलनेत एकूण ४८ तालुक्यांपैकी ३ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ७ तालुक्यात ८० ते १०० टक्के व ३८ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागाचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २४.४९ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर २५.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. विभागातील पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक आहे. बाजरी, खरीप ज्वारी, सोयाबीन, सूर्यफूल व तूर ही पिके वाढीच्या अवस्थेत असून विभागात काही ठिकाणी पुरेसा निचरा न होणाऱ्या जमिनीतील ज्वारीचे पीक पावसामुळे पिवळे पडत आहे. मूग पीक, फुले/शेंगा लागण्याच्या अवस्थेत आहेत. तर उडीद पीक हे वाढीच्या/फुले लागण्याच्या अवस्थेत आहे. खरीप पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

. . .५

**किड व रोग** :- विभागात सोयाबीन पिकावर उंट अळीचा व कापूस पिकावर बोंड अळीचा व रस शोषणाऱ्या किडीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला तर मूग पिकावर अल्प प्रमाणात मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आला.

**अमरावती विभागात १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पेरणी**

अहवाल कालावधीमध्ये हवामान ढगाळ होते. विभागात दि. ९ ऑगस्ट, २०१० अखेरीस सरासरीच्या तुलनेत एकूण ५६ तालुक्यांपैकी ८ तालुक्यात ८० ते १०० टक्के व ४८ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागाचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.९२ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर ३२.७६ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकाची पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झालेली आहे. पेरणी झालेल्या पिकांची वाढ समाधानकारक असून खरीप पिकांच्या आंतरमशागतीची कामे सततच्या पावसाने खोळंबली आहे. मूग व उडीद पीक फुलोरा अवस्थेत आहे. कापूस, सोयाबीन व ज्वारी वाढीच्या अवस्थेत आहेत. विभागात सततच्या पावसाने पाणथळ जमिनीतील पिकांची वाढ खुंटली असून ती पिवळी पडत आहे.

विभागात सोयाबीन पिकावर पाने खाणारी अळी, चक्रीभुंग्याचा व कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडीचा अल्पप्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

**नागपूर विभागात १६.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी**

अहवाल कालावधीमध्ये हवामान ढगाळ व पावसाळी होते. विभागात दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेरीस सरासरीच्या तुलनेत एकुण ६४ तालुक्यांपैकी १ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ५ तालुक्यात ८० ते १०० टक्के , ५ तालुक्यात ८० ते १०० टक्के व ५८ तालुक्यात १०० टक्के पेक्षा अधिक पाऊस झाला.

विभागाचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.६९ लाख हेक्टर असून दिनांक ९ ऑगस्ट, २०१० अखेर १६.७५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ९५ टक्के क्षेत्रावर खरीप पिकाची पेरणी झाली आहे. विभागात सर्वत्र भात वगळता इतर खरीप पिकांच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. लवकर पेरणी झालेल्या खरीप पिकांच्या आंतरमशागतीची कामे प्रगतीपथावर आहेत. विभागातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत भात लावणी अंतिम टप्प्यात आहे.

विभागात सोयाबीन पिकावर उंट अळी, चक्रीभुंगा आणि तंबाखुवरील पाने खाणाऱ्या अळीचा, भात पिकावर लष्करी अळी, खोड किडीचा व कापूस पिकावर मावा व तुडतुडे किडीचा अल्प प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला.

----००-----

. . ६

**मंत्रीमंडळ निर्णय : . . ६**

# नगरपालिका अधिनियमातील दंडाच्या रकमेमध्ये सुधारणा

मुंबई, दि. ११ : महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींचा कारभार चालतो. हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून म्हणजे दिनांक १० सप्टेंबर १९६५ पासून अधिनियमातील विविध तरतूदींचे उल्लंघन केल्यानंतर अपराध सिध्दीनंतर आकारण्यात येणाऱ्या दंडाच्या रकमेच्या तरतुदीत सुधारणा करण्यात आली नव्हती. त्यामुळे त्यात सुधारणा करून विविध अपराधांसाठी असलेल्या दंडाच्या रकमा १० पट करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

-----------

. . . 7/

**मंत्रीमंडळ निर्णय : . . ७**

# तेजस्विनी सावंत हिचे
# मंत्रिमंडळ बैठकीत अभिनंदन

मुंबई, दि. ११ : म्युनिक येथे झालेल्या विश्व नेमबाजी स्पर्धेमध्ये ५० मीटर रायफल शुटींग प्रकारात सुवर्णपदक पटकावुन विश्वविक्रम करणारी महाराष्ट्रकन्या तेजस्विनी सावंत हिचे आज राज्य मंत्रिमंडळाने हार्दिक अभिनंदन केले.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मंत्रालयात मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीच्या सुरुवातीला श्री. चव्हाण यांनी तेजस्विनी सावंत हिच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला. मंत्रिमंडळाच्या सर्व सदस्यांनी तो संमत केला. यावेळी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्यासह मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सदस्य उपस्थित होते.

००००००००

सीएमपीआरओ/रजक/